महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ १९ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २०४ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## ठाकरेंनी त्यांचे नगरसेवक सांभाळून ठेवावेत

### - एकनाथ शिंदेंची टीका ■ महापौर निवडणुकीपूर्वी शिवसेनेचे सर्व नगरसेवक ताज लँड्स एंडमध्ये

मुंबई महापालिका निवडणुकीत. महायुतीला बहुमत मिळालं आहे. महायुतीचा महापौर आता मुंबईमध्ये बसलेला पाहायला मिळाणार आहे. तत्पूर्वी महायुतीत मोठ्या नाट्यमय घडामोडी घडलेल्या पाहायला मिळत आहेत. निवडून आलेले शिंदे सेनेचे नगरसेवक मुंबईतल्या पंचतारांकीत हॉटेलात मुक्कामाला गेलेले आहेत. त्यांना तसे पक्षाचे आदेश असल्याची माहिती सुत्रांनी दिलेली आहे. पण यावरुन आता विविध तर्क वितर्क लावले जात आहेत. शिंदेंना मराठी आणि शिवसेनेचा महापौर मुंबईत हवा आहे, अडीच वर्ष महापौर पद शिवसेनेला हवं असाही एक कयास यामागे राजकीय जाणकार लावत आहेत. त्यामुळेचं शिंदेंनी ही खेळी खेळली आहे, असं सांगितलं जात आहे.

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८**

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या मुंबईतील नगरसेवकांना मार्गदर्शन केलं. नगरसेवकांना मार्गदर्शन केल्यानंतर शिंदे यांनी माध्यमांसोबत संवाद साधला. नगरसेवकांनी वॉर्डचा कायापालट कसा होईल, वॉर्ड चकाचक कसा होईल. आपला वॉर्ड आदर्श कसा होईल यासाठी काम केलं पाहिजे. विकासाची स्पर्धा लागली पाहिजे. मुंबईकरांनी विकासाला स्वीकारलेलं असून भावनिक मुद्दे नाकारले आहेत, विकासविरोधी भूमिका असणाऱ्यांना मतदारांनी नाकारलं आहे, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.**



**■ नगरसेवकांनी संधीचं सोनं करावं: एकनाथ शिंदे**

महायुतीला मोठी संधी मिळालेली आहे. या संधीचं सोनं करणं आवश्यक आहे, अशा प्रकारच्या सूचना नगरसेवकांना दिल्या आहेत, असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं. शिवसेनेचा गट कोकण भवनमध्ये रजिस्टर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मुंबईकरांनी विश्वास दाखवला आहे त्या विश्वासाला पात्र ठरण्याचं काम शिवसेनेच्या आणि महायुतीच्या नगरसेवकांनी करावं अशी अपेक्षा आहे, असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादानं आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून समोर आल्याचा आनंद आहे. विधानसभा, ग्रामपंचायत, नगरपालिका आणि महापालिकेत शिवसेना दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. हा विजय म्हणजे उद्याच्या लोकसभेची आणि विधानसभेची पायाभरणी आहे. त्यासाठी नगरसेवकांनी आदर्श वॉर्ड निर्माण झाले पाहिजेत आणि आदर्श नगरसेवक म्हणून काम केलं पाहिजे. आपण निवडून दिलेला नगरसेवक, लोकप्रतिनिधी कसा योग्य आहे, ही भावना लोकांच्या मनात निर्माण झाली पाहिजे, असं मार्गदर्शन केल्याचं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं.

**■ मुंबईचा महापौर युतीचा**

तुमच्या वागण्यावर आणि बोलण्यावर नागरिकांचं लक्ष आहे. शिवसेनेच्या नावाला गालबोट लागेल, असं कोणतंही कृत्य नगरसेवकांनी करु नये, असं एकनाथ शिंदे म्हणाले. लाडकी बहीण योजना नगरपालिका, महापालिका आणि विधानसभेला गेमचेंजर ठरलीय, असं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. माझ्या अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात काम केलं ते लोकांनी स्वीकारलेलं आहे. शिवसेनेचे 400 पेक्षा जास्त नगरसेवक निवडून आल्याचं एकनाथ शिंदे म्हणाले. जनतेनं दिलेला कौल मान्य केला आहे, त्रुटी असतील काही राहून गेलं असेल ते दुरुस्त केलं जाईल, असंही एकनाथ शिंदे यांनी म्हटलं.

**■ उद्धव ठाकरेंनी त्यांचे नगरसेवक सांभाळून ठेवावेत**

शिवसेना घाबरणारी पार्टी आहे का, शिवसेनेला लोकं घाबरतात. नवीन नगरसेवक निवडून आले आहेत,विचारांची देवाण घेवाण व्हावी. प्रस्ताव कसे बनवायचं, याबाबत मार्गदर्शन करण्यात आलं. सर्वांना एकत्र बोलायचं होतं, त्यासाठी नगरसेवकांना हॉटेलमध्ये ठेवलंय. असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं. उद्धव ठाकरेंनी त्यांचे नगरसेवक सांभाळून ठेवावेत, असंही शिंदे यांनी म्हटलं.

## संपादकीय

### देशातील सर्वात लांब फ्युनिक्युलर सेवा सुरू



कल्याणमधील श्री मलंगगडावर भाविकांसाठी मोठा दिलासादायक बदल घडून आला आहे. देशातील सर्वात लांब फ्युनिक्युलर सेवा अखेर सुरू झाली असून, रविवारी भाजप आमदार किसन कथोरे आणि सुलभा गायकवाड यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. हा प्रकल्प भाविकांच्या सोयीसाठी अत्यंत महत्वाचा आहे. याआधी मलंगगडावर जाण्यासाठी २६०० पायऱ्या चढून अंदाजे २ तासांचा प्रवास करावा लागत होता. आता फ्युनिक्युलर सेवेमुळे हा प्रवास अवघ्या १० मिनिटांत पूर्ण करता येईल. वृद्ध, लहान मुलं आणि शारीरिक अडथळ्य असलेले भाविकही आता गडावर सहज पोहोचू शकतील.

हा प्रकल्प २००४ मध्ये आमदार किसन कथोरे यांनी प्रस्तावित केला होता. विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली याला मंजुरी मिळाली, पण काही काळ प्रकल्पाकडे दुर्लक्ष झाले. २०१२ मध्ये कामाला सुरुवात झाली, आणि नंतरच्या अडथळ्यांनंतर २०२६ मध्ये अखेर हे स्वप्न साकार झाले. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी निधी उपलब्ध करून प्रकल्पाला गती दिली, आणि आता यंदा भाविकांना ही सुविधा प्रत्यक्ष अनुभवायला मिळाली आहे.

फ्युनिक्युलर सेवा दिवसभर ७० कर्मचारी यांच्या देखरेखीखाली कार्यरत राहणार असून, एकावेळी १२० जण प्रवास करू शकतात. दोन दिवसांची ही सेवा सुप्रीम कंपनीकडून विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आल्याने भाविकांचा उत्साह दुपटीने वाढला आहे. या सुविधा केवळ यात्रेकरता नव्हे, तर पर्यटनाला आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला देखील चालना देतील. मलंगगडावरील पवित्र स्थळ आणि परिसर आता अधिक सुरक्षित, जलद आणि सोयीस्कर मार्गाने भाविकांसाठी खुले झाले आहे. श्री मलंगगडाच्या या फ्युनिक्युलर सेवेमुळे भाविकांच्या अनुभवाला एक नवीन उंची मिळाली आहे, आणि यात्रेचा आनंद आता प्रत्येकासाठी सोपा आणि सुलभ झाला आहे.

## उल्हासनगर महापालिकेत सत्तासंघर्ष रंगला

### ● छोट्या पक्षांची भूमिका निर्णायक ●

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८ उल्हासनगर : उल्हासनगर महानगरपालिकेच्या निकालानंतर शहरात विजयाचा जल्लोष रंगला, पण काही वेळातच राजकारणाची खरी 'रात्रीची खेळी' सुरू झाली. बहुमतापासून फक्त एका जागेवर थांबलेल्या भाजपसमोर आव्हान उभे असताना, शिवसेनेच्या शिंदे गटाने सत्तास्थापनेसाठी आक्रमक हालचाली सुरू केल्याने राजकीय वातावरण तापले आहे.**

७८ सदस्यांच्या महापालिकेत भाजप ३७ जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला आहे, मात्र बहुमतीसाठी आवश्यक ३९ जागांचा आकडा गाठण्यात भाजपाला एका जागेची कमतरता भासली. शिंदे गटाला ३६ जागा, वंचित बहुजन आघाडीला २, काँग्रेसला १, साई पक्षाला १ आणि अपक्ष उमेदवाराला १ जागा मिळाल्याने महापालिकेतील सत्तेचा कौल छोट्या घटकांच्या हातात गेला आहे.निकालानंतर विजयाचा आनंद संपताच शिंदे गटाचे विजयी उमेदवार मध्यरात्री खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या भेटीसाठी दाखल झाले, ज्यामुळे सत्तासमीकरणांची जुळवाजुळव सुरू झाल्याचे संकेत मिळाले.

भाजप सर्वात मोठा पक्ष असला तरी सत्तास्थापनेसाठी त्यांना इतर पक्षांचा पाठिंबा आवश्यक आहे. शिंदे गटानेही वंचित बहुजन आघाडी, काँग्रेस, साई पक्ष आणि अपक्ष यांच्याशी संपर्क वाढवण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे 'किंगमेकर' ठरणाऱ्या या छोट्या घटकांची राजकीय किमत अचानक वाढली आहे. निकालानंतरचा आनंद आता सत्तास्थापनेच्या धावपळीत बदलला असून, उल्हासनगरचे राजकारण दिवसाइतकेच रात्रीही सक्रिय आहे. महापालिकेची सत्ता कुणाच्या हाती जाणार, अंतिम क्षणी कोण बाजी मारणार आणि कोण विरोधी बाकावर बसणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. येत्या काही दिवसांत उल्हासनगरच्या राजकीय इतिहासात निर्णायक वळण येण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे.





## शिंदेंच्या बालेकिल्ल्यात 'मशाल' पेटवणारे शहाजी खुस्पे मातोश्रीवर !

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८**

**ठाणे :** ठाणे महापालिकेतील माजी महापौर व शिंदे गटाचे ज्येष्ठ नगरसेवक अशोक वैती यांचा धक्कादायकरित्या पराभव करणारे 'जायंट किलर' ठरलेले शहाजी खुस्पे यांनी रविवारी शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची मातोश्री येथे जाऊन भेट घेतली. ठाणे महापालिका निवडणुकीत मशाल चिन्हावर निवडून येणारे ते एकमेव उमेदवार ठरले आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानाजवळ राहणारे अशोक वैती ज्या प्रभागातून निवडणूक लढवत होते, त्याच प्रभागात त्यांचा पराभव झाल्याने राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त केले जात आहे. शिवसेनेकडून (शिंदे गट) अशोक वैती हे मागील अनेक वर्षांपासून प्रभाग क्रमांक १३ मधून निवडून येत होते. ज्ञानेश्वर नगर, रामचंद्र नगर, काजूवाडी, हाजुरी हा परिसर या प्रभागात समाविष्ट असून वैती यांनी यापूर्वी महापौरपदही भूषविले होते. ठाकरे गटाकडून नवखे उमेदवार असलेले शहाजी खुस्पे यांनी अनुभवी वैती यांचा धक्कादायक पराभव करत राजकीय समीकरणे बदलली. याच प्रभागात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेही निवासस्थान आहे. प्रचाराच्या टप्प्यातच शहाजी खुस्पे यांनी आघाडी घेतल्याने या विजयाची शक्यता वर्तवली जात होती. ठाण्यात ठाकरे गटाचे ते एकमेव विजयी उमेदवार ठरल्याने या निकालाला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, अशोक वैती यांच्या पराभवामुळे शिंदे गटाला मोठा राजकीय धक्का बसल्याची चर्चा आहे.



## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत जिल्ह्यातील गावांत सेलिब्रिटी माध्यमातून जनजागृती

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८**

**ठाणे :** राज्य शासनाच्या "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" अंतर्गत जिल्हा परिषद ठाणे यांच्या वतीने ठाणे जिल्ह्यातील गावांमध्ये व्यापक जनजागृतीसाठी सेलिब्रिटी भेटींचे आयोजन करण्यात आले. अभिनेत्री शिवाली परब व अभिनेता पृथ्वीक प्रताप यांनी भिवंडी, शहापूर व मुरबाड तालुक्यांतील विविध गावांना भेट देत ग्रामस्थांना अभियानामध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे मार्गदर्शन केले.

**कार्यक्रमातील ठळक वैशिष्ट्ये:**

**भिवंडी तालुका (डोहळे):** जिल्हा परिषद शाळेतील परसबाग व आवारातील बागेची पाहणी, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत गृहप्रवेश, रुग्णवाहिकेचे उद्घाटन. महिला बचत गटांचे विक्री प्रदर्शन आणि ग्रामविकास कामांचे चित्रफीत सादरीकरण.

**शहापूर तालुका (भावसे–खोस्ते):** महिला बचत गटांद्वारे सेंद्रीय पद्धतीने पिकवलेल्या कडधान्याचे प्रदर्शन, सन्मानचिन्ह व वृक्ष भेट देऊन स्वागत, पारंपारिक आदिवासी गौत्या नृत्य. डिजिटल शाळा आणि रेन वॉटर हार्वेस्टिंग कामाचे उद्घाटन, जलतारा, शोषखड्डा, सिंचन विहीर व मोगरा लागवड प्रकल्पांची पाहणी.

**मुरबाड तालुका (खेवारे):** जिल्हा परिषद केंद्रशाळा खेवारे येथे डिजिटल शाळा उद्घाटन, शोभायात्रा, महिला प्रेरणा संघाच्या सामूहिक परसबाग प्रकल्पाची पाहणी. डास निर्मूलन उपक्रम आणि अनिष्ट रूढी निर्मूलन पान ३ वर ▶▶▶

## आमदार किसन कथोरेंच्या उपस्थितीत शिवसेना उपशहरप्रमुख प्रवीण राऊतांचा भाजपात प्रवेश

### बदलापूरात शिवसेनेला धक्का

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८**

**बदलापूर :** कुळगाव बदलापूर नगरपरिषदेत पक्षांतर्गत नाराजी उफाळून आली असून शिंदेंच्या शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे. शिवसेना शहर उपप्रमुख प्रवीण राऊत यांनी शेकडो समर्थकांसह भाजपात प्रवेश केला. विशेष म्हणजे, राऊत यांच्या पत्नी आणि वहिनी दोघीही शिवसेनेच्या नगरसेविका आहेत. तसेच शिवसेनेच्या नगरसेविका दीपाली लामतुरे यांचे पती गणेश लामतुरे यांनीही भाजपाची वाट धरली आहे. त्यामुळे बदलापूरातील शिवसेनेत सारे काही आलबेल नसल्याचे चित्र आहे.

रविवारी बदलापूर येथे आमदार किसन कथोरे यांच्या उपस्थितीत प्रवीण राऊत यांनी औपचारिकरित्या भाजपात प्रवेश केला. कार्यक्रमाला नगराध्यक्षा रुचिता घोरपडे, माजी नगराध्यक्ष राजेंद्र घोरपडे, भाजप गटनेते शरद तेली, शहराध्यक्ष किरण भोईर, रमेश सोळसे यांसह भाजपचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी आमदार किसन कथोरे यांनी शिवसेनेतील घराणेशाहीवर टीका केली. शिवसेनेत वरिष्ठांना न जुमानता निर्णय घेतले जातात असे सांगत त्यांनी नामोल्लेख नसलेला टोला शिवसेना शहरप्रमुख वामन म्हात्रे यांना लगावला. गेली २५ वर्षे पक्षासाठी प्रामाणिकपणे काम करूनही आपल्याला आणि आपल्या कार्यकर्त्यांना दुय्यम वागणूक मिळाल्याचा आरोप करत पक्ष सोडण्यामागील कारणे, प्रवीण राऊत यांनी स्पष्ट केली. भाजपात आपल्या कार्यकर्त्यांना योग्य मान सन्मान मिळेल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

## महत्वाचे

### विहीरीत आढळला २० वर्षीय मुलाचा मृतदेह

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८**

**ठाणे :** घोडबंदर येथील तुर्केपाडा भागात रविवारी पहाटे एका विहीरीमध्ये २० वर्षीय मुलाचा मृतदेह आढळला. शवविच्छेदन अहवालानंतर त्याच्या मृत्यूचे नेमके कारण समजू शकेल असे कासारवडवली पोलिसांनी सांगितले. तुर्फेपाडा येथे शशिकुमार नाकोडी (२०) हा त्याच्या आईसोबत राहत होता. शनिवारी दुपारनंतर तो घरी आला नव्हता. त्यामुळे त्याच्या आईने आणि परिसरातील नागरिकांनी त्याचा सायंकाळी शोध सुरु केला. तो बेपत्ता होण्यापूर्वी त्याने पाण्याने भरलेली बादली घरी आणली होती. त्यामुळे तो पुन्हा विहीरीच्या दिशेने पुन्हा गेला असावा असा अंदाज नागरिकांना आला. त्यामुळे मध्यरात्री त्यांनी विहीरीत पाहिले असता, त्यांना शशिकुमारचा मृतदेह पाण्यात तरंगताना आढळून आला. घटनेची माहिती ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभाग, अग्निशमन दल आणि कासारडवली पोलिसांना मिळाल्यानंतर पथकाने रविवारी पहाटे त्याचा मृतदेह विहीरीतून बाहेर काढला. शशिकुमार हा अपंग होता. त्याच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप समजू शकले नसून याप्रकरणाची नोंद करण्यात आल्याचे कासारवडवली पोलिसांनी सांगितले.

### भाजपचे ज्येष्ठ नेते राज के. पुरोहित यांचे निधन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८**

माजी मंत्री आणि वरिष्ठ भाजपा नेते राज पुरोहित यांचं आज मुंबईत प्रकृती अस्वास्थ्यामुळे निधन झालं. ते ७१ वर्षांचे होते. पुरोहित यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात नगरसेवकपदापासून केली. त्यानंतर महाराष्ट्र विधानसभेत त्यांनी २५ वर्षं आमदार म्हणून काम केलं. मुंबईतील मुंबादेवी आणि कुलाबा विधानसभा मतदारसंघातून निवडून आले होते. तसंच १९९५ ते १९९९ दरम्यान, युती सरकारमध्ये त्यांनी कामगार, दुग्धविकास आणि संसदीय कार्य मंत्री नंतर गृहनिर्माण मंत्री म्हणूनही त्यांनी काम केलं. दक्षिण मुंबईतल्या स्थानिक विशेषतः भाडेकरुंच्या प्रश्नांवर त्यांनी काम केलं. ते काही काळ भाजपाचे मुंबई अध्यक्षही होते. नुकत्याच झालेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेत त्यांचे पुत्र आकाश पुरोहित हे निवडून आले आहेत.

## भिवंडीतील छत्रपती शिवाजी महाराज मंदिरास शिक्षण मंत्री दादा भुसे यांची सदिच्छा भेट

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८**

**भिवंडी : भिवंडी तालुक्यातील मराडे पाडा येथे शिवक्रांती प्रतिष्ठानतर्फे उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज मंदिरास महाराष्ट्र राज्याचे शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे यांनी सायंकाळी सदिच्छा भेट देत महाराजांना अभिवादन केले.**



यावेळी त्यांच्या समवेत शिवसेना नेते प्रकाश पाटील, उपनेते व माजी आमदार रुपेश म्हात्रे, तसेच शिवक्रांती प्रतिष्ठानचे संस्थापक राजुभाऊ चौधरी उपस्थित होते. मंदिरात मंत्री दादा भुसे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीची पूजा, महाआरती करण्यात आली व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी मंत्री दादा भुसे म्हणाले की, "गेल्या अनेक महिन्यांपासून सोशल मीडियावर या मंदिराची माहिती पाहत होतो. भिवंडीतील या मंदिराला भेट देण्याची माझी इच्छा आज पूर्ण झाली असून, ही भेट अत्यंत समाधानकारक ठरली आहे." छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आशीर्वादानेच आपण व सर्व कार्यकर्ते समाजहिताचे कार्य करत असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी शिवक्रांती प्रतिष्ठानचे संस्थापक राजुभाऊ चौधरी यांच्या वतीने मंदिर परिसरात मंत्री दादा भुसे व उपस्थित मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. मंदिर उभारणीसाठी कार्यकर्त्यांनी घेतलेल्या परिश्रमांचे मंत्री दादा भुसे यांनी विशेष कौतुक केले.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com



## वाचक मनोगत

### जेव्हा कर्तृत्वाला राष्ट्रपती भवनात सन्मान मिळतो

भारताच्या प्रजासत्ताक दिनाचा उत्सव म्हणजे केवळ संचलन, झेंडावंदन आणि भाषणांचा सोहळा नाही, तर देशाच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याला मिळणारी मान्यताही होय. याच गौरवशाली परंपरेचा भाग असलेला राष्ट्रपती भवनातील अत्यंत प्रतिष्ठित 'ॲट होम' सोहळा हा कर्तृत्ववान व्यक्तींसाठी सन्मानाची पावती मानला जातो. भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त या सोहळ्यासाठी महाराष्ट्रातील चार मान्यवरांची निवड होणे, ही राज्यासाठी अभिमानाची बाब आहे.

■ **शेतीतून स्वावलंबनाचा जागतिक आदर्श**

रायगड जिल्ह्यातील नेरळ येथील सगुणा बाग आणि तिचे संस्थापक श्री. चंद्रशेखर हरि भडसावळे हे नाव भारतीय शेतीच्या आधुनिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. नैसर्गिक शेती, शून्य नांगरणी तंत्र (SRT), जलसंवर्धन, कृषी पर्यटन आणि ग्रामीण विकास या क्षेत्रात त्यांनी उभारलेला एकात्मिक शेतीचा प्रयोग आज जागतिक स्तरावर अभ्यासला जातो.

१९७६ पासून सुरू असलेला हा प्रवास केवळ उत्पादनापुरता मर्यादित न राहता शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढवणारा ठरला आहे. मत्स्यव्यवसाय, गो-पालन, वनशेती व पर्यटन यांची सांगड घालणारे सगुणा बाग मॉडेल हे "शेतीही नफा देऊ शकते" याचे जिवंत उदाहरण आहे.

■ **सर्पदंशावरील उपचारात मानवतावादी क्रांती**

नांदेड जिल्ह्यातील मुखेड येथील डॉ. दिलीप पुंडे यांचे कार्य म्हणजे वैद्यकीय सेवेतून समाजपरिवर्तनाचा आदर्श नमुना आहे. शहरातील उज्ज्वल करिअर संधी सोडून दुर्गम भागात सेवा देण्याचा घेतलेला निर्णय आज हजारो जीव वाचवणारा ठरला आहे. १९८८ मध्ये मुखेड परिसरात सर्पदंशामुळे होणारा २५ टक्के मृत्यूदर आज त्यांच्या शास्त्रीय उपचार पद्धतीमुळे शून्य टक्क्यांवर आणणे, ही वैद्यकीय क्षेत्रातील मोठी कामगिरी आहे. जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) त्यांच्या कार्याची दखल घेत 'राष्ट्रीय सर्पदंश मार्गदर्शन समिती'मध्ये त्यांचा समावेश करणे, हे त्यांच्या सेवाभावाचे राष्ट्रीय मान्यतेचे प्रतीक आहे.

■ **योजनांचा लाभार्थी – परिवर्तनाचा साक्षीदार**

जळगाव जिल्ह्यातील धरणगाव येथील श्री. अरविंद गुलाब चौधरी हे केंद्र सरकारच्या 'प्रधानमंत्री आवास योजने'चे प्रतिनिधी म्हणून या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. सरकारी योजनांचा लाभ सर्वसामान्यांच्या जीवनात कसा सकारात्मक बदल घडवू शकतो, याचे ते मूर्त उदाहरण ठरले आहेत. धोरणे आणि प्रत्यक्ष लाभ यातील दरी कमी होत असल्याचा संदेश त्यांच्या उपस्थितीतून अधोरेखित होतो.

■ **स्टार्टअपमधून राष्ट्रउभारणीचा सहभाग**

मुंबईचे युवा उद्योजक आकाश शहा यांनी स्टार्टअप्स आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात केलेले योगदान हे आधुनिक भारताच्या आर्थिक प्रगतीचे द्योतक आहे. नवोन्मेष, रोजगारनिर्मिती आणि तंत्रज्ञानाधारित विकासात स्टार्टअप्सची भूमिका वाढत असताना, त्यांच्या कार्याची दखल राष्ट्रपती भवनाकडून घेतली जाणे हे प्रेरणादायी आहे.

**सन्मानापेक्षा मोठा संदेश**

राष्ट्रपतींच्या उपस्थितीत होणारा 'ॲट होम' सोहळा म्हणजे केवळ स्वागत समारंभ नव्हे, तर देशासाठी काम करणाऱ्या नायकांना दिलेली मौन दाद आहे. शेती, आरोग्य, सामाजिक कल्याण आणि उद्योजकता या चार वेगवेगळ्या क्षेत्रांतील महाराष्ट्रातील मान्यवरांची निवड ही बाब सांगून जाते की, राष्ट्रउभारणीचे योगदान कुठल्याही एका क्षेत्रापुरते मर्यादित नाही. हा सन्मान म्हणजे केवळ व्यक्तींचा गौरव नसून, त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजाने पुढे जाण्याचा दिलेला संदेश आहे. हा केवळ निमंत्रणांचा कार्यक्रम नाही. तो अशा समजहितकारी व्यक्तींसाठी सन्मानाचा क्षण असतो!

**राहूल विलास भोईर**
**चिकणघर कल्याण**

# ठाणे जिल्ह्यात भाजपची पकड वाढली

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८**

ठाणे : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या ठाणे जिल्ह्यातील महापालिका निवडणूक निकालांनी यावेळी वेगळेच राजकीय चित्र स्पष्ट केले आहे. ठाणे महापालिकेचा अपवाद वगळता जिल्ह्यातील जवळपास सर्वच शहरी भागांमध्ये भाजपने शिंदे गटाला थेट आणि प्रभावी आव्हान उभे केल्याचे या निकालांतून दिसून आले आहे.

ठाणे महापालिकेत बहुमताचा आकडा ओलांडत शिंदे गटाने सत्तेच्या दिशेने निर्णायक वाटचाल केली असली, तरी नवी मुंबई, मीरा-भाईंदर आणि उल्हासनगर या महापालिकांमध्ये भाजपने शिंदे गटाला मोठा धक्का दिला आहे. त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील एकूणच राजकीय वर्चस्वाबाबत नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे.

कल्याण-डोंबिवली महापालिकेत भाजप आणि शिवसेना (एकनाथ शिंदे गट) यांच्यात युती झाली होती. या युतीत शिंदे गट 'मोठा भाऊ' ठरला असला, तरी भाजपची ताकद तेथेही फारशी कमी नसल्याचे निकालातून स्पष्ट झाले आहे. भाजप शिंदे गटाच्या



अगदी जवळपास पोहोचल्याने, भविष्यातील स्थानिक राजकारणात दोन्ही पक्षांमधील स्पर्धा अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

विशेष बाब म्हणजे उल्हासनगर महापालिकेत भाजप आणि शिंदे गट समान जागांवर स्थिरावले आहेत. त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील आगामी राजकारणात शिंदे गटासमोर विरोधक म्हणून काँग्रेस किंवा ठाकरे गटापेक्षा भाजपच अधिक प्रभावी ठरणार, हे संकेत मिळत आहेत.

मुंबईसह ठाणे आणि कल्याण-डोंबिवली या दोन महापालिकांमध्ये भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत युती झाली होती. मात्र ठाणे जिल्ह्यातील सर्वच महापालिका युतीत लढवाव्यात, अशी शिंदे गटातील नेत्यांची ठाम इच्छा असूनही ती प्रत्यक्षात उतरली नाही. या संदर्भात दिल्ली दरबारी चर्चाही झाली होती, मात्र त्यातून शिंदे गटाच्या अपेक्षांवर पाणी फेरले गेले. नवी मुंबई, मीरा-भाईंदर आणि उल्हासनगर या महापालिकांमध्ये भाजपने युती न करता स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. नवी मुंबईत तर शिंदे गटाकडून युतीसाठी वनमंत्री गणेश नाईक यांची भेट घेण्यात आली होती. मात्र त्यानंतरही भाजपने युती न करता निवडणुकीचे सर्वाधिकार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गणेश नाईक यांच्याकडेच सोपवले.

या निर्णयाचा परिणाम नवी मुंबईत स्पष्टपणे दिसून आला. येथे झालेल्या रंगतदार आणि चुरशीच्या लढतीत भाजपने ६५ जागा जिंकत एकहाती सत्ता मिळवली. हा विजय केवळ संख्याबळाचा नसून, ठाणे जिल्ह्यात भाजपची वाढती पकड आणि संघटनात्मक ताकद अधोरेखित करणारा ठरला आहे.

एकूणच, ठाणे जिल्ह्यातील महापालिका निवडणूक निकालांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर आगामी काळात भाजप हेच सर्वात मोठे राजकीय आव्हान ठरणार असल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. युती असो वा थेट लढत, भाजपची आक्रमक रणनीती आणि वाढता जनाधार लक्षात घेता, जिल्ह्यातील राजकारण अधिक चुरशीचे आणि निर्णायक वळण घेणार, हे मात्र निश्चित.

# भिवंडी महापालिकेत सत्ता स्थापनेसाठी काँग्रेस व भाजपच्या हालचाली कोणार्क विकास आघाडी वेट अँड वॉचच्या भूमिकेत

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी ( प्रतिनिधी)** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या मतमोजणीचा निकाल धक्कादायक लागल्यामुळे राजकीय पक्षाच्या पुढाऱ्यांनी सत्ता व महापौर पद मिळवण्यासाठी आखलेली गणित बिघडली आहेत.महापालिकेच्या निवडणुकीत कोणत्याही पक्षाला बहुमत मिळालेले नाही, या निवडणुकीत काँग्रेस पक्षाची पिछेहाट झाली असली तरी काँग्रेस पक्षाला सर्वाधिक म्हणजे 30 जागा मिळाल्या आहेत त्यामुळे काँग्रेस पक्ष आपला मित्र पक्ष म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शिवसेना,राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार),समाजवादी पक्ष,भिवंडी विकास आघाडी आणि राजकीय पटलावर प्रत्येक वेळी महापौर पद मिळवून दोन वेळा सत्ता स्थापन करणारे कोणार्क विकास आघाडीचे प्रमुख माजी महापौर विलास पाटील यांना सोबत घेऊन महापालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी दावा करण्यासाठी हालचाली करू लागल्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे भारतीय जनता पक्षाने सुध्दा महायुतीचे महापौर पद व सत्ता मिळवण्यासाठी तयारी सुरू केली असुन शिवसेनेसह अपक्ष व आघाडीच्या नगरसेवकांशी संपर्क साधून तयारी सुरू केली आहे.

संपूर्ण महाराष्ट्रात बहुचर्चित राहिलेल्या भिवंडी महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्षाला गत वेळी पेक्षा यंदा जागा कमी मिळाले आहेत.गेल्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला 47 जागा मिळाल्या होत्या मात्र या निवडणुकीत फक्त 30 जागा मिळवून काँग्रेस सर्वात मोठा पक्ष म्हणून प्रथम क्रमांक राहिला आहे.गेल्या निवडणूकीत बहुमत असताना काँग्रेस पक्षाने दगाफटका होऊ नये यासाठी भाजप पक्षाचे नगरसेवकांना दुर ठेऊन शिवसेनेचे 12 नगरसेवक सोबत घेऊन त्यांना उपमहापौर पद देऊन महापालिकेत सत्ता स्थापन केली होती.त्यामुळे आता पुन्हा काँग्रेस पक्ष शिवसेना (एकनाथ शिंदे),राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष,समाजवादी पक्ष व कोनार्क विकास आघाडीला सोबत घेऊन सत्ता स्थापन करण्यासाठी हालचाली करत आहे.तर भारतीय जनता पक्षाला या निवडणुकीत 22 जागा मिळाल्या आहेत,तर शिवसेनेला 12 जागा मिळाल्या आहेत.त्यामुळे भारतीय जनता पक्षाचे पदाधिकाऱ्यांनी सुध्दा सत्ता स्थापन करून महापौर पद मिळवण्यासाठी शिवसेना पक्षा सोबत घेऊन निवडून आलेले आघाडीचे नगरसेवक व अपक्ष नगरसेवकांशी गुपचूप संपर्क सुरू केला आहे.भिवंडी महापालिकेच्या झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत अनपेक्षित निकाल लागल्याने राजकीय पक्ष व निरीक्षकांचा विचाराचा गोंधळ उडाला आहे.अपेक्षेपेक्षा वेगळे निकाल लागल्याने समाजवादी पक्षाला फक्त 6 जागा मिळाल्याने सपाचे प्रदेशाध्यक्ष आमदार अबु आझमी, भिवंडी पुर्व विधानसभा मतदारसंघाचे समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख जोरदार झटका बसला असून या निवडणुकीत शिवसेना (ठाकरे) मनसे,राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार),आप व इतर काही राजकीय पक्षांचा या निवडणुकीत सुपडा साफ झाला आहे.

महापालिकेत प्रत्येक वेळी सत्ता स्थापन करण्यासाठी इच्छुक असलेले कोणार्क विकास आघाडीचे माजी महापौर प्रतिभा विलास पाटील यांच्या पॅनलचे 4 जागा निवडून आले असुन ते कोणाला पाठिंबा देतात कि स्वतः सत्ता स्थापन करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले असले तरी कोनार्क विकास आघाडी सध्या वेट अँड वॉच भूमिकेत आहे.

**पक्षीय बलाबल :-**

| | | |
|---|---|---|
| भाजप | - | २२, |
| काँग्रेस | - | ३०, |
| शिवसेना | - | १२, |
| राष्ट्रवादी (शप ) | - | १२ |
| समाजवादी | - | ६ |
| कोणार्क विकास आघाडी | - | ४ |
| भिवंडी विकास आघाडी | - | ३ |
| अपक्ष | - | १ |

**आरक्षणाची प्रतिक्षा :-**

**भिवंडी महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका संपन्न झाल्या असल्या तरी महापौर पदाचे अद्याप आरक्षण जाहीर झालेले नाही. त्यामुळे नगरसेवकांमध्ये धाकधूक वाढली असून आरक्षण कोणाच्या बाजूने पडते याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.**

# जगदगुरू नरेंद्र महाराज संस्थान आयोजित रक्तदान शिबिराला पेणकरांचा भरभरून प्रतिसाद

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८**

**पेण :** तुम्ही जगा दुसऱ्यांना जगवा या उक्तीप्रमाणे जगद्गुरु स्वामी नरेंद्र महाराज यांच्या संस्थानतर्फे रक्तदान हे सर्व श्रेष्ठदान समजले जाते. राज्यात सध्या रक्ताचा तुटवडा भासत असल्याने जगद्गुरु नरेंद्राचार्यजी रामानंदाचार्य दक्षिण पीठ नाणिजधाम-महाराष्ट्र यांच्या कृपा आशिर्वादाने पेण शहरात रक्तदान शिबिराचे आयोजन पेण नगरपालिका येथे आज रविवार दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराला नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभला.






अनेक सामाजिक उपक्रमा सोबत दरवर्षीप्रमाणे रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. आज झालेल्या पेण शहरात एकाच दिवशी रक्तदान शिबिरात २५० पेक्षा जास्त रक्त संकलन करण्यात आले.

मानवी जीवनात दानाचे महत्त्व अनमोल आहे. परंतु ज्या दानाने कुणाचे आयुष्य वाचते, ते रक्तदान सर्वश्रेष्ठ पुण्य ठरते. समाजात मायक्रोसाइटिक अनिमिया, सिकलसेल, थैलेसिमिया, हिमोफिलिया, ब्लड कॅन्सर, किडनी फ `ल्युअर अशा गंभीर आजारांशी झुंजणारे हजारो रुग्ण रक्ताच्या एका थेंबासाठी तडफडत असतात. अशा वेळी रक्तदाताच देवदूत ठरू शकतो म्हणून शिबिरात जास्तीत जास्त रक्तदात्यांनी भाग घेऊन रक्तदान केले. या रक्तदान शिबिराला रक्तसंकलन प्रमुख पीठ नाणिजधाम आकाश पाटील पेण तालुका अध्यक्ष किरण म्हात्रे उपतालुकाप्रमुख जयवंत घरत रविंद्र अहेर संजना पाटील अनिकेत जोशी मितेश घरत प्रणित माळी प्रतिक पाटील युक्ती भोईर रोहीत केणी माधवी अहेर वसंत म्हात्रे संजय पाटील रवींद्र भोईर देवीदास पाटील मारूती पाटील

संजय साखरे ज्योती पाटील भारती घरत नंदा भालेराव स्मिता साखरे शिवम म्हात्रे गंगाधर जोशी संदेश पाटील आदी पेण तालुक्यातील सेवेकरांनी सहभागी होऊन कार्यक्रम यशस्वी केला.

# क्रॉस कंट्रीत एसएसटीला ऐतिहासिक विजय



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** एसएसटी कला आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या मुली व मुलांच्या क्रॉस कंट्री संघांनी तुम्ही मुंबई विद्यापीठाद्वारे आयोजित आंतरमहाविद्यालयीन क्रॉस कंट्री अजिंक्यपद स्पर्धा २०२५–२६ मध्ये प्रथम क्रमांक पटकावत महाविद्यालयाच्या क्रीडा इतिहासात सुवर्णअक्षरांनी नोंदवावे असे यश संपादन केले आहे. ही स्पर्धा एसआयए, डोंबिवली येथे उत्साहात पार पडली. या स्पर्धेत एस.एस.टी. महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने सलग पाचव्यांदा, तर मुलांच्या संघाने सलग सहाव्यांदा विजेतेपद मिळवत आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले. कठोर सराव, शिस्तबद्ध तयारी आणि संघभावनेच्या जोरावर खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रतिस्पर्धी संघांना मागे टाकले. वैयक्तिक कामगिरीतही एस.एस.टी.च्या खेळाडूंनी विशेष ठसा उमटवला. विशाल कानोजिया याने शानदार धाव घेत सुवर्णपदक पटकावले, तर

**मुंबई विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत मुली सलग ५ व्या, मुले सलग ६ व्या वर्षी विजेते**

आदिल आणि काजल यांनी प्रत्येकी कांस्यपदक मिळवत संघाच्या यशात मोलाचा वाटा उचलला. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर विशाल कानोजिया, आदिल, हरिओम, काजल आणि तृप्ती यांची आंतर-झोनल क्रॉस कंट्री स्पर्धेसाठी निवड झाली असून ते आता झोनचे प्रतिनिधित्व करणार आहेत. ही निवड त्यांच्या सातत्यपूर्ण परिश्रमांची आणि गुणवत्तेची पोचपावती मानली जात आहे. या ऐतिहासिक यशामुळे महाविद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून प्राचार्य, प्राध्यापक, क्रीडा प्रशिक्षक व विद्यार्थ्यांनी खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

# जिल्हा परिषद माजी अध्यक्ष माणक पाटील यांचे निधन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८ (भिवंडी)**

ठाणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तसेच दिंडेश्वर महादेव मंदिर ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष माणक एकनाथ पाटील (वय ७९) यांचे वृद्धापकाळाने मंगळवार, दि. १३ जानेवारी रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने भिवंडी तालुक्यासह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. पाटील यांनी आपल्या सार्वजनिक जीवनात सामाजिक, धार्मिक आणि राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले. दिंडेश्वर महादेव मंदिर ट्रस्टच्या माध्यमातून त्यांनी धार्मिक व सामाजिक उपक्रम राबवून समाजसेवेला चालना दिली. त्यांच्या पश्चात मुलगा, सून व नातवंड असा परिवार आहे.

भिवंडी तालुक्यातील राहनाळ या त्यांच्या मूळ गावी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यसंस्कार प्रसंगी माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील, माजी उपनगराध्यक्ष ॲड. प्रमोद पाटील, माजी सरपंच राजन भोईर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, स्थानिक नागरिक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# इंटक वीज कामगार संघटनेच्या सह सचिवपदी इंदल राठोड यांची निवड

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**(कुणाल म्हात्रे)**

**कल्याण : कामगारनेते आमदार भाई जगताप याच्या नेतृत्वाखाली चालणाऱ्या कॉंग्रेस प्रणित वीज कामगार संघटनेच्या सह सचिव पदी इंदल राठोड यांची नुकतेच पुणे येथे पार पडलेल्या संघटनेच्या द्विवार्षिक अधिवेशनात निवड करण्यात आली.**

इंदल राठोड हे मूळ नांदेड जिल्ह्यातील एका दुर्लक्षित खेड्यातील असून ते उच्चशिक्षित आहेत ते प्रधान तंत्रदन्य पदावर अबरनाथ औद्योगिक वसाहतीत काम करतात. ग्राहक सेवा करीत असतांना ते कर्तव्याला अधिक महत्व देतात. वीज कामगार म्हणून काम करणे ही एक मोठी सामाजिक जबाबदारी असून या माध्यमातून जनतेची सेवा करण्यात खूप आनंद मिळत असल्याचे राठोड सांगतात. अलीकडे कामगारांविरोधी अनेक कायदे पारित केले जात असल्याने व शासनाचे खाजगी करणाकडे वाटचाल असल्याने कामगारांवर अन्याय केले जातील हे नक्की आहे, त्या मुळे वीज कामगारांना भविष्यात कडव्या संघर्षाला सामोरे जावे लागणार आहे, वीज क्षेत्रात येऊ घातलेले खाजगिकरण हे ग्राहक व कामगार दोघांनाही घातक असल्याने संघर्ष अटळ आहे. तेव्हा भविष्यातील या संभाव्य लढ्यात ग्राहक या नात्याने जनतेनी आम्हाला साथ देण्याची अपेक्षा राठोड यांनी व्यक्त केली. संघटनेच्या सह सचिव पदावर निवड केल्याने संघटनेचे अध्यक्ष भाई जगताप, मुख्य महासचिव प्रकाश गाईकवाड, कार्याध्यक्ष दामोदर चंगोले व मुख्य प्रवक्ते व उपाध्यक्ष राकेश जाधव यांचे त्यानी विशेष आभार मानले.

## भविष्यवेध



■ सोमवार
19 जानेवारी 2026

**मेष**
स्थैर्य लाभेल. गुंतवणुकीसाठी दिवस अनुकूल नाही. संयम ठेवल्यास नातेसंबंध सुधारतील. कामानिमित्त प्रवास संभवतो. बोलण्यातून गैरसमज टाळा. मित्रांचे सहकार्य लाभदायक ठरेल.

**वृषभ**
घरगुती प्रश्नांवर लक्ष द्यावे लागेल. खर्च वाढू शकतो. मानसिक शांतता राखणे आवश्यक. नेतृत्वगुणांना वाव मिळेल. अडकलेली कामे पूर्ण होतील. अहंकार टाळल्यास लाभ होईल.

**मिथुन**
कार्यक्षेत्रात बदल संभवतो. आरोग्याची काळजी घ्या. मेहनतीचे योग्य फळ मिळेल. भागीदारीत सावधगिरी ठेवा. कायदेशीर बाबींमध्ये यश मिळू शकते. कौटुंबिक आनंद वाढेल. कामाचा

**कर्क**
ताण वाढेल. जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागतील. संयम ठेवल्यास यश मिळेल. सर्जनशील कामात यश मिळेल. मित्रांचे सहकार्य लाभेल. खर्चावर नियंत्रण आवश्यक आहे.

**सिंह**
जुनी रखडलेली कामे मार्गी लागतील. नवे संपर्क लाभदायक ठरतील. प्रवासाचे योग आहेत. आरोग्याकडे लक्ष द्या. बोलण्यात संयम ठेवा. कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील.

**कन्या**
निर्णय घेताना भावनांवर नियंत्रण ठेवा. कामाच्या ठिकाणी प्रशंसा मिळेल. आत्मविश्वास वाढेल. महत्त्वाची कामे पूर्ण होतील. खर्च वाढण्याची शक्यता. वाद टाळल्यास दिवस चांगला जाईल.

**तुळ**
आज कामात गती येईल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. खर्चावर नियंत्रण ठेवा. कौटुंबिक वातावरण समाधानकारक राहील. आर्थिक व्यवहारात सावधगिरी आवश्यक. संयम ठेवल्यास यश मिळेल.

**वृश्चिक**
कामात अडथळे येऊ शकतात. संयम आणि मेहनतीने परिस्थिती सुधारेल. आरोग्याची काळजी घ्या. भागीदारीत लाभ संभवतो. सामाजिक सन्मान मिळेल. आर्थिक निर्णय विचारपूर्वक घ्या.

**धनु**
भावनिक निर्णय टाळा. आर्थिक स्थिती सुधारेल. कौटुंबिक सौख्य मिळेल. नवीन जबाबदाऱ्या मिळतील. कामात यश मिळेल. आर्थिक व्यवहारात सावध राहा. कुटुंबाकडून पाठिंबा मिळेल.

**मकर**
गुप्त शत्रूंपासून सावध रहा. आर्थिक निर्णय पुढे ढकला. संयम फायदेशीर ठरेल. शिक्षण व करिअरमध्ये प्रगती होईल. नवीन ओळखी उपयोगी पडतील. दिवस उत्साहवर्धक आहे.

**कुंभ**
कामाचा ताण जाणवेल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. आर्थिक स्थैर्य हळूहळू वाढेल. नवीन कल्पनांना यश मिळेल. सामाजिक कार्यात सहभाग वाढेल. खर्चाचे नियोजन करा. भावनिक स्थैर्य आवश्यक.

**मिन**
कौटुंबिक आनंद मिळेल. मन अस्वस्थ राहू शकते. महत्त्वाचे निर्णय पुढे ढकला. नातेवाईकांकडून सहकार्य मिळेल. नवीन संधी मिळण्याची शक्यता. प्रवास यशस्वी ठरेल. आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज,खर्डी
मुंबई विद्यापीठाशी संलग्न "नॅक मूल्यांकन प्राप्त B Grade"
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT)
UNDER GRADUATE: B.Sc. I.T., B.Sc. CHEMISTRY MATHS, B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. GEOGRAPHY
Look forward to a BRIGHTER FUTURE
8669244522
9923992390






# भिवंडी महापालिका निकालानंतर शहरात तणाव, तोडफोड व दगडफेक; गुन्हे दाखल

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८**

**भिवंडी :** भिवंडी महानगरपालिका निवडणुकीच्या निकालानंतर शहरात विविध ठिकाणी दगडफेक व तोडफोडीच्या घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी भिवंडी पोलिसांनी चार वेगवेगळ्या तक्रारींच्या आधारे दोन डझनहून अधिक नावाजलेल्या आरोपींसह सुमारे २०० पेक्षा अधिक अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हे दाखल केले असून, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या सहाय्याने आरोपींची ओळख पटवून पुढील कारवाई सुरू केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भिवंडीतील कल्याण रोड नविवस्ती परिसरातील रहिवासी ताहा असमोहम्मद खान (२५) यांनी दाखल केलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की, १६ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास (दुपारी ४ नंतर) कल्याण रोडवरील लकडा मार्केटमधील एस.एस.के. फॅब्रिकेशन दुकानाजवळ काही संशयितांनी जमाव करून काठ्या व इतर शस्त्रांच्या सहाय्याने हल्ला केला. दगडफेक करून दुकानाची तोडफोड करण्यात आली तसेच जीवे मारण्याच्या धमक्याही देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेत अनेक जण जखमी झाले असून, पोलिसांनी एकूण १६ संशयितांची नावे नोंदवली आहेत. यामध्ये निहाल खान, इम्रान खान, एहसान खान, गुलाम गौस खान व इसरार खान यांचा समावेश आहे.

दुसऱ्या घटनेत, इम्रान अब्दुल रहमान खान (४०) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १६ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ४ ते ४:३० या वेळेत लकडा मार्केट परिसरात निवडणूक चर्चेदरम्यान वाद झाला व त्याचे हिंसाचारात रूपांतर झाले. आरोपी मोटारसायकलवरून घटनास्थळी आले, शिवीगाळ करत दगडफेक केली तसेच कार्यालयात घुसून खुर्च्या व इतर साहित्याची तोडफोड केली. या हल्ल्यात अनेक कामगार जखमी झाले. या प्रकरणी दीन मोहम्मद, सम मोहम्मद खान, ताहा असमोहम्मद खान यांच्यासह इतरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, अद्याप कोणालाही अटक झालेली नाही. दोन्ही बाजूंनी परस्पर तक्रारी दाखल करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

याशिवाय, न्यू कणेरी येथील मार्कंडेय नगर परिसरातील रहिवासी श्रीनिवास नरसिंह वैंगल (३७) यांनी तक्रार दिली आहे की, १५ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ७:२० वाजता मतदान संपल्यानंतर वॉर्ड क्रमांक ३ च्या गेटसमोर त्यांच्या पत्नीला धमकी देत हल्ला करण्यात आला. निवडणूक लढवण्यावरून नाराजी व्यक्त करत शिवीगाळ करण्यात आली. दोन पुरुषांनी पत्नीचा हात मुरडून मारहाण केली तसेच मनोज ठाकूर व रतन सिंग यांनी जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. दरम्यान, श्रीरंग नगर येथील रहिवासी राजेश राजिली चेरियाल यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, १५ जानेवारी २०२६ रोजी निवडणुकीत दिलेल्या समर्थनावरून वाद झाला असता आरोपींनी शिवीगाळ करून चापटा, लाथा व ठोसे मारले. या प्रकरणी मनोज ठाकूर, श्रीकांत दासी, राजेश शेट्टी व इतर अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भिवंडी शहरात निवडणूक निकालानंतर घडलेल्या या घटनांमुळे तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांकडून बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

# भाजपच्या अभूतपूर्व मुसंडीने कल्याण–डोंबिवलीचं सत्तासमीकरण बदलतंय !

## शिंदे गटात अस्वस्थता तर ठाकरेंच्या बालेकिल्ल्याला हादरा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८ जानेवारी**

**कल्याण :** मागील जवळपास वीस वर्षांपासून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेवर शिवसेनेने भाजपच्या साथीने आपली सत्ता अबाधित राखली होती. महापौरपद आपल्याच ताब्यात ठेवत पालिकेवरील राजकीय पकड मजबूत ठेवण्यात शिवसेना (एकनाथ शिंदे गट) यशस्वी ठरली होती. मात्र यंदाच्या महानगरपालिका निवडणुकीत हे सत्तासमीकरण लक्षणीयरीत्या बदलले असून, भाजपने अभूतपूर्व कामगिरी करत राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे.

यावेळी झालेल्या निवडणुकीत भाजपने एकूण ५४ पैकी तब्बल ५१ जागांवर विजय मिळवत 'छोटा भाऊ' आता 'मोठा भाऊ' होत असल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. या यशामुळे शिवसेना (एकनाथ शिंदे गट) पक्षातील नेत्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून, पालिकेतील वर्चस्वाला मोठे आव्हान उभे राहिले आहे.

विशेष म्हणजे डोंबिवली पश्चिममधील भाजपच्या तीन जागा अंतर्गत राजकारण आणि फंदफितुरीमुळे हातातून गेल्या नसत्या, तर आज शिवसेना शिंदे गट आणि भाजप यांची पालिकेत बरोबरीची संख्या झाली असती, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगत आहे. गेल्या दोन दशकांपासून पालिकेवर सत्ता टिकवून ठेवणाऱ्या शिवसेना शिंदे गटाची यावेळी कामगिरी तुलनेने सुमार ठरली आहे. भाजपपेक्षा केवळ एक जागा अधिक मिळवता आली असली, तरी घसरलेल्या जागांमुळे शिंदे गटात नाराजीचे वातावरण आहे.

पालिका निवडणुकीसाठी शिवसेना (एकनाथ शिंदे गट) यांनी एकूण ६८ जागांवर उमेदवार उभे केले होते, मात्र त्यापैकी केवळ ५२ उमेदवार निवडून आले, तर १६ जागांवर पराभव पत्करावा लागला. ही घट पक्षाच्या पारंपरिक बालेकिल्ल्यात चिंतेचा विषय ठरत आहे.

दरम्यान, या निवडणुकीत ठाकरे गटाने कल्याणमध्ये मोठा दणका दिला आहे. कल्याण हा शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांवर निष्ठा ठेवणारा शिवसैनिक आजही कपाळावर लाल टिळा लावून अभिमानाने फिरतो. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसेनेतून बाहेर पडल्यानंतरही कल्याणमधील मोठा आणि जुना गट अद्याप उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे.

या निवडणुकीतील सर्वात ठळक बाब म्हणजे भाजपने मिळवलेले निर्विवाद वर्चस्व. एकूण ५४ जागांपैकी ५१ जागांवर मिळवलेला विजय हा केवळ संख्याबळाचा नाही, तर भाजपच्या संघटनात्मक ताकदीचा आणि स्थानिक पातळीवरील प्रभावाचा ठोस पुरावा मानला जात आहे. अनेक वर्षे 'छोटा भाऊ' म्हणून ओळखला जाणारा भाजप आता कल्याण-डोंबिवलीत नेतृत्वाच्या भूमिकेत येत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

दुसरीकडे, शिवसेना (एकनाथ शिंदे गट) साठी हा निकाल अंतर्मुख करणारा ठरला आहे. ६८ जागांवर उमेदवार उभे करूनही १६ जागांचा पराभव पत्करावा लागणे, ही बाब पक्षाच्या पारंपरिक बालेकिल्ल्यातील पकड सैल होत असल्याचे दर्शवते. भाजपपेक्षा केवळ एक जागा अधिक मिळवूनही, घसरलेल्या जागांमुळे पक्षातील नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये नाराजी व अस्वस्थता जाणवू लागली आहे.

या निकालातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे ठाकरे गटाचा प्रभावी हस्तक्षेप. शिवसेनेचा गड मानल्या जाणाऱ्या कल्याणमध्ये, निष्ठावान शिवसैनिकांनी कोणत्याही आमिषाला न जुमानता उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या भूमिकेला पाठिंबा दिला. परिणामी, शिंदे गटाचे जुने-जाणते माजी नगरसेवक आणि माजी महापौर नवख्या उमेदवारांकडून पराभूत झाले. हा निकाल केवळ उमेदवारांचा पराभव नसून, निष्ठा आणि विचारधारेचा विजय असल्याची भावना ठाकरे गटाकडून व्यक्त होत आहे.

एकूणच, कल्याण-डोंबिवली महापालिकेचा हा निकाल आगामी स्थानिक आणि विधानसभा राजकारणाची दिशा ठरवणारा ठरणार आहे. भाजपची वाढती ताकद, शिंदे गटासमोरील संघटनात्मक आव्हाने आणि ठाकरे गटाचा निष्ठावान मतदारांवरचा प्रभाव — या सगळ्यामुळे पुढील काळात कल्याणचे राजकारण अधिक चुरशीचे आणि निर्णायक होणार, हे मात्र निश्चित.

गेल्या तीन वर्षांत या निष्ठावान शिवसैनिकांना विविध आमिषे दाखवून शिंदे गटात आणण्याचे प्रयत्न झाले. मात्र हा शिवसैनिक कोणत्याही आमिषाला किंवा दबावाला बळी पडला नाही. याच निष्ठेचे प्रतिबिंब या निवडणुकीत पाहायला मिळाले. शिवसेना शिंदे गटाचे जुने-जाणते माजी नगरसेवक व माजी महापौर यांना ठाकरे गटाच्या नवख्या उमेदवारांनी दणकून पराभूत करत कल्याणच्या राजकारणात मोठा उलटफेर घडवून आणला आहे.

एकूणच, कल्याण-डोंबिवली महापालिकेतील हा निकाल केवळ जागांचा हिशेब नसून, आगामी काळातील स्थानिक राजकारणाची दिशा ठरवणारा ठरतो आहे. भाजपची वाढती ताकद, शिंदे गटाची अस्वस्थता आणि ठाकरे गटाचा बालेकिल्ल्यातील जोरदार पुनरागमन — यामुळे पुढील राजकीय घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

# मलंगगडावर देशातील सर्वात लांब पल्ल्याची फ्युनिक्युलर ट्रेन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / प्रतिनिधी / दि. १८ जानेवारी**

**कल्याण :** कल्याणमधील श्री मलंगगडावर देशातील सर्वात लांब फ्युनिक्युलर सेवा अखेर सुरू झाली आहे. रविवारी भाजपा आमदार किसन कथोरे आणि सुलभा गायकवाड यांच्या हस्ते या सेवेचं लोकार्पण करण्यात आलं. आजपासून सुरू झालेल्या या फ्युनिक्युलर सेवेमुळे भाविकांना मलंगगडावर जाणं अधिक सोपं, सुरक्षित आणि जलद होणार आहे. विशेष म्हणजे, सुप्रीम कंपनीकडून भाविकांसाठी दोन दिवस ही सेवा विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आली आहे. श्री मलंगगड यात्रेच्या आधीच फ्युनिक्युलर सेवा दाखल झाल्याने भाविकांची मोठी सोय होणार आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत जिल्ह्यातील गावांत सेलिब्रिटी माध्यमातून जनजागृती

पान १ वरून ▶▶▶ फलकाचे उद्घाटन, श्रमदानाद्वारे जलतारा, वृक्षारोपण आणि ग्रामस्थांशी संवाद.

अभिनेत्री शिवाली परब यांनी गावांना आवाहन केले की, प्रत्येक ग्रामस्थाने अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून स्पर्धात्मक स्वरूपात बक्षिसे मिळवून गावाचा सर्वांगीण विकास साधावा. अभिनेता पृथ्वीक प्रताप यांनी सांगितले की, शासकीय योजना गावातील प्रत्येक घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी या अभियानाचा प्रभावी वापर करावा.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, पाणीपुरवठा यासह मूलभूत सुविधा ग्रामस्थांना उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन सज्ज आहे, आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग घेऊन समृद्ध गावनिर्मितीत हातभार लावावा.

कार्यक्रमास आमदार दौलत भिका दरोडा, माजी जिल्हा परिषद सदस्य सुभाष (आप्पा) घरत, उल्हासभाऊ बांगर, माजी सभापती पंचायत समिती अनिल घरत, प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, कार्यकारी अभियंता प्रकाश सासे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छता व पाणीपुरवठा) पंडित राठोड, गटविकास अधिकारी (भिवंडी, शहापूर, मुरबाड) यांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# कॉँग्रेसला स्वबळाचा नारा भोवला?

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८ (ठाणे) :**

**ठाणे :** ठाणे महापालिकेतील निवडणुकीत कॉँग्रेसला पराभवाचा मोठा धक्का बसला आहे. महाविकास आघाडीच्या माध्यमातून सत्ताधारी युतीला रोखण्यासाठी कॉँग्रेसने ३३ प्रभागांतील १३१ जागांपैकी ६० जागांवर उमेदवार उभे केले, त्यात जिल्हाध्यक्ष विक्रांत चव्हाणसह अनेक वरिष्ठ नेते रिंगणात उतरले होते. मतमोजणीनंतर स्पष्ट झाले की कॉँग्रेसला एकही जागा जिंकता आली नाही, ज्यामुळे पक्षाच्या रणनीतीला मोठा धक्का बसला आहे. महाविकास आघाडीच्या भागीदारीत कॉँग्रेसने ३५–४० जागांची मागणी केली होती, पण इतर घटक पक्ष फक्त ५–६ जागांवर सहमत झाले होते. या निकालामुळे ठाणे महापालिकेतील सत्तेचे समीकरण राष्ट्रवादी कॉँग्रेस, मनसे आणि शिवसेना (उद्धव गट) यांच्याभोवती केंद्रित झाले आहे. कॉँग्रेससाठी ही निवडणूक राजकीय पुनरावलोकनासाठी महत्त्वपूर्ण ठरली आहे.

- ठाणे महापालिका निवडणुकीत कॉँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. महाविकास आघाडीच्या माध्यमातून सत्ताधारी युतीला रोखण्यासाठी कॉँग्रेसने स्वतःच्या स्वबळावर ६० उमेदवार उभे केले, परंतु एकही जागा जिंकता आले नाही.
- महाविकास आघाडीत कॉँग्रेसला ३५–४० जागांची मागणी होती, पण इतर घटक पक्षांनी ५–६ जागांवरून मर्यादित सहमती दिली.
- जिल्हाध्यक्ष विक्रांत चव्हाणसह अनेक वरिष्ठ नेते रिंगणात उतरले, तरीही मतांचा फायदा होऊ शकला नाही.



- परिणाम दर्शवतो की कॉँग्रेसच्या ठाणेतील प्रतिमेला मोठा धक्का बसला असून, पक्षाच्या रणनीतीत फेरबदल आवश्यक आहे.
- या निकालामुळे ठाणे महापालिकेतील सत्तेची समीकरणे अधिकच स्पष्ट झाली आहेत, ज्यात राष्ट्रवादी कॉँग्रेस, मनसे आणि शिवसेना (उद्धव गट) यांच्या माध्यमातून महाविकास आघाडी सत्तेवर राहू शकते.

# महापालिका विजयानंतर अनघा देवळेकर भावूक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८**



ठाणे : कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत कल्याणचे दिवंगत माजी महापौर राजेंद्र देवळेकर यांच्या पत्नी अनघा देवळेकर यांनी शिवसेना (एकनाथ शिंदे गट) तर्फे प्रभाग क्रमांक २ ब मधून दणदणीत विजय मिळवला आहे. विजयाची घोषणा होताच त्या प्रचंड भावूक झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडली होती, तर १६ जानेवारी रोजी मतमोजणी करण्यात आली. या निवडणुकीत अनघा देवळेकर यांनी शिवसेना शिंदे गटातून निवडणुकीच्या रिंगणात उतरून मतदारांचा भक्कम विश्वास संपादन केला. त्यांनी प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करत ३ हजार ९४ मताधिक्याने विजय मिळवला आहे.

हा विजय अनघा देवळेकर यांच्यासाठी विशेष भावनिक ठरला. कारण ज्या दिवशी त्यांचा विजय जाहीर झाला, त्याच दिवशी दिवंगत माजी महापौर राजेंद्र देवळेकर यांची जयंती होती. पतीच्या आठवणींनी त्या क्षणी त्यांना गहिवरून आणले असून, अनेक कार्यकर्ते आणि नागरिकांनी त्यांचे सांत्वन करत अभिनंदन केले.

कल्याण-डोंबिवली महापालिकेचे माजी महापौर राजेंद्र देवळेकर यांनी आपल्या कार्यकाळात मनपामध्ये वेगळा ठसा उमटवला होता. तळागाळातील जनतेशी थेट नाते जोडणारे नेतृत्व म्हणून ते ओळखले जात होते. सभागृहातील त्यांची अभ्यासपूर्ण, वस्तुनिष्ठ आणि प्रभावी भाषणे आजही स्मरणात आहेत. त्यांच्या कार्याची आणि जनसेवेची परंपरा पुढे नेण्याची जबाबदारी आता अनघा देवळेकर यांच्यावर आली असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

या विजयामुळे शिवसेना (शिंदे गट) साठी कल्याणमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, अनघा देवळेकर यांच्या माध्यमातून दिवंगत राजेंद्र देवळेकर यांच्या कार्याचा वारसा पुढे सुरू राहील, अशी अपेक्षा समर्थकांकडून व्यक्त केली जात आहे.

# रोटरी क्लब ऑफ डोंबिवली ईस्टचा 36 वर्षीय कर्करोग रुग्णासाठी मदतीचा हात

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८**

**गोवेली : रोटरी क्लब ऑफ डोंबिवली ईस्टने समाजसेवा आणि सेवा भावी कार्यासाठी आणखी एक उल्लेखनीय पाऊल उचलले आहे. क्लबने ३६ वर्षीय कर्करोग रुग्णाच्या शस्त्रक्रियेसाठी निधी प्रदान केला, ज्यामुळे रुग्णाला तोंडातील कर्करोग (ओरल कॅन्सर) शमन करण्यासाठी आवश्यक उपचार वेळेत मिळाले.**

रुग्णाची शस्त्रक्रिया १० जानेवारी रोजी शमन कॅन्सर केअरमध्ये यशस्वीरीत्या पार पडली. रुग्णाच्या उपचारासाठी क्लबचे अध्यक्ष संदीप घरत यांनी महत्त्वपूर्ण योगदान देत निधी संकलनाची मोहीम यशस्वी केली.

या निधीमुळे रुग्णाला रेडिएशन व कीमोथेरपीसारखी पुढील उपचार मोफत करण्याची सोय झाली आहे. अध्यक्ष संदीप घरत म्हणाले, "Service Above Self – हा रो टरीचा मूलमंत्र आहे. आम्ही सदैव समाजातील दुर्बल घटकांच्या सेवेसाठी तत्पर असतो. या रुग्णाच्या उपचारासाठी आमचा क्लब आणि सदस्यांनी एकजुटीने योगदान दिले आहे. ही सेवा केवळ एका व्यक्तीपुरती मर्यादित नसून, संपूर्ण समाजासाठी आहे."

रोटरी क्लब ऑफ डोंबिवली ईस्ट ठाणे-कल्याण-डोंबिवली परिसरातील सक्रिय क्लबांपैकी एक असून, आरोग्य व इतर सामाजिक क्षेत्रात सातत्यपूर्ण कार्यरत आहे. अलीकडेच क्लबने 'Run to Care' मॅरेथॉन आयोजित करून कर्करोग व इतर वैद्यकीय प्रकल्पांसाठी निधी संकलन केले होते, ज्यामुळे अनेक रुग्णांना मदत मिळत आहे. क्लबचे सदस्य आणि डोंबिवलीतील नागरिकांनी या सेवाकार्यास कौतुक केले असून, भविष्यातही अशा उपक्रमांसाठी सहकार्य करण्याची तयारी दर्शविली आहे.

# विद्यार्थ्यांनी आवडत्या क्षेत्रात भविष्य उज्वल करावे – आ. ज्ञानेश्वर म्हात्रे

## जिल्हा स्तरीय विज्ञान प्रदर्शनात तळवली आश्रम शाळेच्या 'स्मार्ट व्हिलेज' प्रकल्पाला प्रथम क्रमांक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८**



**ठाणे :** विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या क्षेत्रात कौशल्य विकसित करून भविष्य उज्वल करावे तसेच देश व राज्याचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर कसे पुढे नेता येईल याचा विचार करावा, असे आवाहन कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी केले.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना राज्य व आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी मिळावी यासाठी "मुख्यमंत्री विज्ञान विद्यार्थी वारी" उपक्रम राबविण्याची मागणी आपण अधिवेशनात मुख्यमंत्र्यांकडे केली असल्याचे त्यांनी सांगितले. या अंतर्गत तालुक्यातील ५० विद्यार्थ्यांना मुंबई येथील नेहरू सायन्स सेंटर, जिल्ह्यातील ५० विद्यार्थ्यांना बंगळुरू येथील इस्रो सायन्स सेंटर, तर राज्यातील ५० विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर नासा येथे पाठवून शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली कौशल्य विकास करण्याचा प्रस्ताव मंजूर करून घेतल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच आधुनिक युगात रासायनिक शेतीपेक्षा सेंद्रिय शेतीकडे लक्ष देण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

विकसित व आत्मनिर्भर भारताच्या उद्दिष्टांसाठी राज्य विज्ञान शिक्षण संस्था व प्रादेशिक विज्ञान प्राधिकरण यांच्या वतीने शाश्वत शेती, कचरा व्यवस्थापन व प्लास्टिकला पर्याय, हरित ऊर्जा, उदयोन्मुख तंत्रज्ञान, गणितीय मॉडेलिंग, आरोग्य व स्वच्छता, जलसंवर्धन व व्यवस्थापन या विषयांवर विज्ञान प्रदर्शनांचे आयोजन करण्यात येते. याच अनुषंगाने जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) देविदास महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग, ठाणे आणि सेंच्युरी रेयॉन विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शहाड, कल्याण येथे दि. १२ व १३ जानेवारी रोजी ५३ वे जिल्हा स्तरीय विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

या प्रदर्शनात तालुका व मनपा स्तरावरून प्राथमिक विभागाचे २७, माध्यमिक विभागाचे २८, प्राथमिक शिक्षकांचे १०, माध्यमिक शिक्षकांचे ११, प्रयोगशाळा परिचय ५, दिव्यांगांचे ४ असे एकूण ८५ प्रकल्प सादर करण्यात आले होते. प्रदर्शनास सुमारे २०० विद्यार्थ्यांनी भेट दिली.

या स्पर्धेत मुरबाड तालुक्यातील तळवली (बारागाव) आश्रम शाळेच्या निर्भय शिवाजी पडवळ (इ. ११ वी) व विराज आलम (इ. १२ वी) या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'स्मार्ट व्हिलेज' प्रकल्पाने प्रथम क्रमांक पटकावला. वज्रेश्वरी हायस्कूलने द्वितीय, तर शहापूर तालुक्यातील टाकी पठार आश्रम शाळेने तृतीय क्रमांक मिळविला.

विज्ञान प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी उपशिक्षणाधिकारी भाऊराव मोहिते, उपशिक्षणाधिकारी संदीप पाटील, विस्तार अधिकारी प्राजक्ता राऊत, सेंच्युरी रेयॉन हायस्कूलच्या मुख्याध्यापिका वंदना भदाणे व शालेय व्यवस्थापनाने विशेष परिश्रम घेतले. यावेळी ठाणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सचिव प्रवीण लोंढे, उपमुख्याध्यापक प्रमोद पारसे, केंद्रप्रमुख व अन्य मान्यवर उपस्थित होते.



# शिंदेंकडून अडीच वर्षे महापौरपदाचा प्रस्ताव अद्याप नाही - मंत्री बावनकुळे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८**

मुंबई महापालिकेच्या महापौर पदावरून मोठ्या घडामोडी सुरू आहेत. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांच्या शिवसेनेच्या सर्व नगरसेवकांना मुंबईतील एका पंचतारांकीत हॉटेलमध्ये ठेवलं आहे. त्यामुळे शिंदेंच्या शिवसेनेने भाजपाकडे अडीच-अडीच वर्षे महापौरपदाचा प्रस्ताव ठेवल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. या चर्चावर आता भाजपाचे नेते तथा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. शिंदेंच्या सेनेकडून असा कोणताही प्रस्ताव दिलेला नाही, असं चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केलं आहे. मुंबई महापालिकेत अडीच-अडीच वर्ष महापौर व्हावा अशी मागणी शिंदेंच्या शिवसेनेने केली आहे का? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. यावर बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, "आमच्या पार्लमेंट्री बोर्डाकडे अशी कोणतीही मागणी आलेली नाही. आमच्या पार्लमेंट्री बोर्डाची बैठक होईल, आमच्या महायुतीच्या समन्वयक समितीमध्ये एकनाथ शिंदे देखील आहेत, अजित पवार देखील आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्री चर्चा होईल. कोणी काय मागणी केली? यावर देखील चर्चा होईल. तसेच एकनाथ शिंदे यांना काही चर्चा करायची असेल तर ते थेट फडणवीस यांच्याशी चर्चा करतील", असं बावनकुळे यांनी म्हटलं आहे.





# विद्यार्थी रमले निसर्गमेळ्यात

## स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पर्यावरण शिक्षण

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी**

**कल्याण :** पर्यावरण दक्षता मंडळ आणि रोटरी क्लब ऑफ डोंबिवली फिनिक्स यांच्या संयुक्त विद्यमाने "निसर्गमेळा २०२६" चे आयोजन करण्यात आले होते. या मध्ये विविध शाळेतील ७ वी आणि ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी एकूण १० वेगवेगळ्या प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आणि एकूण 23 शाळेतील 520 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धांमागचे मुख्य उद्दिष्ट पर्यावरण शिक्षण देणे व त्याच बरोबर जनजागृती घडवणे हा होता.

या निसर्गमेळयामध्ये झाडे ओळखा स्पर्धा, पीपीटी सादरीकरण, स्वाक्षरी संकलन स्पर्धा, फुलपाखरू ओळखा, वक्तृत्व स्पर्धा (विषय: मानव वन्यजीव संघर्ष आणि बदलती खाद्य संस्कृती), पक्षी नोंदवही (स्क्रॅपबूक) स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, मातीचे भांडे रंगवणे स्पर्धा, रील इट लाईव्ह आणि पथनाट्य अशा एकूण १० स्पर्धांचा समावेश होता. सर्व स्पर्धांसाठी तज्ञ व मान्यवर परिक्षकांचे सहकार्य लाभले. कल्याण डोंबिवली परिसरातील तज्ञ मंडळींनी या कार्यात मोलाचे सहकार्य केले.

रोटरी क्लब ऑफ डोंबिवली फिनिक्सतर्फे सर्व विजेत्या स्पर्धकांना पुरस्कृत करण्यात आले तसेच सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.

पर्यावरण दक्षता मंडळातर्फे खारफुटी या विषयावर प्रदर्शनी प्रदर्शनी सादर करण्यात आली. १० जानेवारी रोजी वनस्पती ओळखा स्पर्धा फुलपाखरू ओळखा स्पर्धा रोटरी गार्डन व चिऊ पार्क येथे आयोजित करण्यात आली होती. १४ जानेवारी रोजी प.द.म कार्यालय, डोंबिवली येथे डोंबिवलीतील हवेची गुणवत्ता: कारणे व परिणाम आणि बाल्कनीतील परसबाग/ फुलपाखरू बाग या विषयांवर PPT सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली.

विद्यार्थ्यांनी खारफुटी परिसंस्था या विषयावर सुंदर चित्रे रंगवली तसेच वनवासी कला मातीच्या भांड्यांवर सादर केली. नवरात्रि व मकरसंक्रांतीदरम्यान वापरल्या जाणाऱ्या घटांचे अपसायकलिंग करण्याच्या आमच्या कल्पनेला पाठिंबा देत, खत प्रकल्पातून मातीचे भांडे उपलब्ध करून देण्यात आले.

एकूण 23 शाळांमधून एकूण 520 विद्यार्थी सहभागी झाले होते. पर्यावरण दक्षता मंडळाचे स्वयंसेवक व प.द.म. ठाणे च्या मनाली धांगडे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये मदत केली आणि प.द.म. डोंबिवली चे कार्यकर्त्या समीक्षा चव्हाण आणि रूपाली शाईवाले यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले.

# हळदी समारंभातील जेवणातून 30 ते 40 लोकांना विषबाधा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८**

**कल्याण पश्चिमेतील हायप्रोफाईल मोहन प्राईड इमारतीतील बाविस्कर कुटुंबाच्या हळदी समारंभात जेवण केल्यानंतर तब्बल ३० ते ४० जणांना उलट्या व जुलाबाचा त्रास झाल्याने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्याचा प्रसंग ओढावला. ही धक्कादायक घटना शनिवारी रात्री घडली.**

प्राप्त माहितीनुसार, बाविस्कर कुटुंबातील मुलीचा हळदी समारंभ शनिवारी पार पडला होता. या समारंभानिमित्त आलेल्या नातेवाईक व पाहुण्यांनी रात्री जेवण केले. मात्र काही तासांतच अनेकांना उलट्या व जुलाबाचा त्रास सुरू झाला. प्रकृती खालावल्याने सर्वांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या अन्नविषबाधेचा अधिक त्रास ज्येष्ठ नागरिक व लहान बालकांना झाल्याचे समजते. विशेष म्हणजे ज्या मुलीचा हळदी समारंभ होता, तिला तसेच तिची आई व बहिण यांनाही विषबाधा झाली. या घटनेमुळे रविवारी होणारा विवाह समारंभ रद्द करावा लागल्याचे कुटुंबीयांनी प्रसारमाध्यमांना सांगितले. दरम्यान, या प्रकरणी संबंधित जेवण कंत्राटदाराविरोधात खडकपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी कुटुंबीयांकडून करण्यात आली आहे.

# समझोता करार सर्व कर्मचाऱ्यांसाठी बंधनकारक न्यायालयाने केडीएमसीचे अपिल फेटाळले

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८ (मुंबई)**

**मुंबई :** कामगार संघटना आणि कल्याण-डोंबिवली महापालिका (केडीएमसी) यांच्यातील समझोता करारावरून उद्भवलेल्या कायदेशीर लढाईत उच्च न्यायालयाने निर्णय दिला. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, सलोखा प्रक्रियेतील वाटीघाटी सर्व कर्मचाऱ्यांसाठी बंधनकारक आहेत आणि पालिकेला कर्मचाऱ्यांना योग्य लाभ देणे आवश्यक आहे.



कल्याण-डोंबिवली महापालिकेने जुलै २०११ मधील एकलपीठाच्या आदेशाला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. कामगारांच्या तक्रारी मंजूर करण्याचा ठाणे औद्योगिक न्यायालयाचा आदेश एकलपीठाने कायम ठेवला होता. कर्मचाऱ्यांचा दावा होता की समझोता कराराच्या कलम (१) नुसार पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू केल्या गेल्या नाहीत, त्यामुळे त्यांना त्या लागू करण्याची मागणी केली होती.

याचिकेवर सुनावणी न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठासमोर झाली. या सुनावणीत केडीएमसीकडून अ‍ॅड. ए. एस. राव आणि कर्मचाऱ्यांकडून अ‍ॅड. योगेंद्र पेंडसे यांनी आपापल्या बाजू मांडल्या. दोन्हीकडील युक्तीवाद ऐकून खंडपीठाने कर्मचाऱ्यांच्या बाजूने निर्णय दिला.

खंडपीठाने स्पष्ट केले की, ३ जानेवारी १९९६ रोजी केडीएमसी आणि कर्मचाऱ्यांच्या दोन संघटनांमध्ये झालेला समझोता करार सर्व कर्मचाऱ्यांसाठी बंधनकारक आहे. या करारामुळे केडीएमसी कर्मचाऱ्यांसाठी पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करेल. पालिकेने यापूर्वी असा युक्तिवाद केला होता की, करार संघटनेचे सदस्य नसलेल्या कर्मचाऱ्यांवर लागू होत नाही; उच्च न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळला आणि कर्मचाऱ्यांना योग्य ते लाभ देण्याचे निर्देश दिले आहेत.

या निर्णयामुळे सर्व कर्मचाऱ्यांसाठी न्यायसंगत व पारदर्शक वाटाघाटी सुनिश्चित झाल्या असून, महापालिकेच्या प्रशासनासाठीही हा सकारात्मक संदेश ठरला आहे.

# अपघातग्रस्तांना मदत करणाऱ्यांना रोख बक्षीसासह जिल्हाधिकाऱ्यांकडून मिळणार "मदतवीर" सन्मान

**आपत्ती व्यवस्थापन तज्ञ व रायगड भूषण प्रा. डॉ. जयपाल पाटील**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८ (पेण)**

महामार्गावर किंवा रस्त्यावर दोनचाकी व चारचाकी वाहनांच्या अपघातात जखमी झालेल्यांना आपल्या कुटुंबातील सदस्य समजून मदत केल्यास भारत सरकारकडून आता रु.२५ हजारांचे रोख बक्षीस तसेच जिल्हाधिकाऱ्यांकडून "मदतवीर" हा सन्मान दिला जाणार आहे, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन तज्ञ व रायगड भूषण प्रा. डॉ. जयपाल पाटील यांनी दिली.

रायगड जिल्हा परिवहन कार्यालयातर्फे सुरक्षा सप्ताह निमित्त जिते, ता. पेण येथे आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. अपघातग्रस्तांना तातडीने महाराष्ट्र पोलीस ११२ व बीव्हीजी इंडिया १०८ रुग्णवाहिका सेवेला फोन करून मदत करण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी रायगड जिल्हा परिवहन अधिकारी माधव सूर्यवंशी होते. यावेळी वाहन निरीक्षक विष्णु घोडे, दीपक ठाकरे, संतोष मोरे, मंगेश चौधरी, सहाय्यक निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक एकनाथ सकपाळ, तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. सूर्यवंशी यांच्या हस्ते डॉ. जयपाल पाटील यांचा तुळस रोप देऊन सन्मान करण्यात आला.

डॉ. पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, अपघात कधीही व कुठेही होऊ शकतो. त्यामुळे नागरिकांनी निर्भयपणे मदतीस पुढे यावे. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री ना. नितीन गडकरी यांनी जाहीर केल्यानुसार यापूर्वी रु.५ हजार असलेले बक्षीस वाढवून आता रु.२५ हजार करण्यात आले आहे. यासाठी परिवहन अधिकाऱ्यांमार्फत शिफारस केली जाईल. यासोबतच त्यांनी विविध आपत्तींसाठी आवश्यक हेल्पलाईन क्रमांकांची माहिती दिली; यात:-

जंगलात आग लागल्यास – १९२६
रेल्वे प्रवासातील आपत्ती – १८२
रक्ताची गरज – १०४
घरगुती आग – १०१
महिला सुरक्षेसाठी – ११२
गर्भवती महिलांसाठी आरोग्य मदत – १०२

**यावेळी दादर सागरी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक एकनाथ सकपाळ, महिला पोलीस स्वप्नाली पाटील व स्वरा पाटील यांनी ११२ क्रमांकाची माहिती दिली. रायगड जिल्हा १०८ सेवेचे प्रमुख अजय जगताप, डॉक्टर निर्मला डांगे व पायलट धर्मा झेंडे उपस्थित होते. पेण नगरपरिषदेचे रमेश देशमुख यांनी अग्नि शमन प्रात्यक्षिकात सहभाग घेतला. पनवेल येथील सामाजिक कार्यकर्ते श्री. जे. एम. म्हात्रे यांच्या कंपनीकडून १०३३ रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करून देण्यात आली. या कार्यशाळेचा लाभ सुमारे २०० वाहन चालक, मालक, अधिकारी व कर्मचारी यांनी घेतला. रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात अशा कार्यशाळा राबविण्यात येतील, असे सूर्यवंशी यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परिवहन अधिकारी किरण पाटील यांनी केले, तर आभार अक्षय खाडे यांनी मानले.**

# पतंगाच्या मांजाच्या काचदार दोऱ्याला अडकून अनेक पक्षी जखमी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १८**

**कल्याण** - कल्याण डोंबिवली पालिका हद्दीत मकर संक्रांतीनिमित्त उडविण्यात येत असलेल्या पतंगींच्या घातक चिनी मांजाच्या काचदार दोऱ्याला अडकून बगळा, गव्हाळ घुबड, कबतूर असे अनेक पक्षी अडकून जखमी झाले आहेत. कल्याण डोंबिवली पालिका अग्निशमन दलाचे जवान आणि 'प्लॅन्ट अँड ॲनिमल वेल्फेअर सोसायटी' (पॉज) संस्थेच्या कार्यकर्त्यांनी एकत्रित बचाव कार्य करून मांजाच्या दोऱ्यात अडकलेल्या या पक्ष्यांची सुटका केली. त्यांच्यावर उपचार करून त्यांना त्याच अधिवासात सोडून देण्यात आले, अशी माहिती 'पॉज' संस्थेचे संस्थापक संचालक नीलेश भणगे यांनी दिली. मकर संक्रांतींच्या काळात घातक चिनी काचदार मांजा वापरू नये आणि या मांजावर बंदी असताना काही दुकानदार अशाप्रकाराचा मांजा विक्री करून पक्ष्यांच्या जीवाला धोका निर्माण करतात, असे पक्षी मित्रांनी सांगितले. पतंग उडवताना मांजा इमारतीवरील पत्र्याचा निवारा, झाडांच्या फांद्या, इमारतीच्या खिडक्यांना अडकतो. पतंग उडविणारा पतंग काढण्यासाठी मांजाला हिसके देत असताना मांजा तुटून त्याच भागात लोंबकळत राहतो. दिवसा, रात्री अनेक पक्षी संचार करत असतात. त्यांच्या मानेला किंवा पायात दोरी अडकून हे पक्षी त्या मांजात अडकून लोंबकळत राहतात. या घातक चिनी मांजाची विक्री करणाऱ्या दुकानांवर दरवर्षी मकरसंक्रातीपूर्वी पोलीस छापे टाकून ते जप्त करतात. यावेळी पालिका निवडणुकांचा माहोल असल्याने पोलीस बंदोबस्तात व्यस्त असल्याने अशाप्रकारची कारवाई यावेळी अधिक प्रमाणात करता आली नाही. गेल्यावर्षी अनेक दुकानांवर छापे मारून पोलिसांनी घातक चिनी नायलॉन धाग्याचे काचदार मांजे जप्त केले होते, असे पक्षी मित्रांनी सांगितले.

## प्रजासत्ताक दिनापासून एसी लोकलच्या फेऱ्या वाढणार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

विरारहून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना एसी लोकलने प्रवास करताना प्रचंड गर्दीचा सामना करावा लागत होता. तसेच काहींना नाईलाजाने एसी लोकलऐवजी दुसऱ्या लोकलने प्रवास करावा लागत होता. त्यामुळे रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने एसी लोकलच्या फेऱ्या वाढवण्याची मागणी केली जात होती. यानुसार प्रजासत्ताक दिनापासून पश्चिम रेल्वे मार्गावर १२ नव्या एसी लोकल फेऱ्या सुरू करण्यात येणार आहेत. यात ६ लोकल फेऱ्या अप मार्गावर तर ६ लोकल फेऱ्या डाऊन मार्गावर वाढवल्या जाणार आहेत. त्यापैकी ४ एसी लोकल फेऱ्या या विरार ते चर्चगेट मार्गावर तर २ नव्या एसी लोकल भाईंदर ते चर्चगेट मार्गावर सुरू केल्या जाणार आहेत.




### मातोश्री महाविद्यालयात

# हरिया महोत्सवांतर्गत टॅलेंटहंटचे आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** शाहू शिक्षण संस्था संचलित मातोश्री वेलबाई देवाजी हरिया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शहाड (कल्याण) येथे हरिया महोत्सव २५ टॅलेंट हंट अंतर्गत विविध सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले होते. पारंपारिक वेशभूषा दिवस साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषेत सहभाग घेत भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविले. बॉलीवूड दिवस व Mr. आणि Ms. हरिया स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपल्या अभिनयकला, आत्मविश्वास व व्यक्तिमत्त्वाचे प्रभावी सादरीकरण केले. शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी Mr. हरिया म्हणून रोहित ब्राम्हणे (SYBA) तर Ms. हरिया म्हणून अष्टपैलू विद्यार्थिनी मेघना भाकरे (TYBA मराठी) या विद्यार्थिनीची निवड करण्यात आली.

फन - मेला आयोजित करण्यात आला. त्यात विविध खेळ, खाद्यपदार्थांचे स्टॉल्स विद्यार्थांनी लाऊन भरघोस कमाई केली अशा उपक्रमांमुळे महाविद्यालय परिसरात उत्साही वातावरण निर्माण झाले. महोत्सवाचा समारोप दि. १७ जानेवारी रोजी भव्य वार्षिक स्नेहसंमेलनने करण्यात आला. विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन, नाट्य व इतर कलागुणांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. चितांमण भोईर, IQAC प्रमुख प्रा. के. डी. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हरिया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले तर सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. संगिता सोमैया व प्रा.सविता पाटील यांनी सर्वच कार्यक्रमांचे यशस्वी नियोजन केले.

या महोत्सवाला डॉ. गिरीश लटके, डॉ. सूर्यकांत भोसले यांची प्रेरणा मोलाची ठरली. या महोत्सवात अनेक विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवून आपल्यात लपलेल्या कला व गुणांना वाव मिळाल्याचे आवर्जून सांगितले. हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनीच हातभार लावला.






# सात दिवसांून एकदाच पाणी !

## वाशी खारेपाट विभागात पाणी टंचाईला सुरुवात



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण (प्रतिनिधी) :** शहापाडा ग्रामीण पाणी पुरवठा योजनेत कृत्रिम पाणी टंचाई निर्माण करून वाशी-शिर्की खारेपाट परिसरावर तीन दिवस आड येणारे पिण्याचे पाणी आत्ता सात दिवस आड पाणी पुरवठा लादण्यात आल्याने परीसरात संतापाची लाट उसळली आहे.

शहापाडा ग्रामिण पाणी पुरवठा अंतर्गत समाविष्ठ गाव-परीसरांत जी "पाणीटंचाई" दाखवली जात आहे, ती वास्तवात नैसर्गिक किंवा तांत्रिक नसून मानव निर्मित व कृत्रिम आहे, हे वस्तुस्थिती पाहणाऱ्या, या विषयांत भाग घेतलेल्या प्रत्येकाला स्पष्ट दिसत आहे. खारेपाटातली पाणी टंचाई व तीन दिवस आड होणारा पाणीपुरवठा नियमित होवून नागरीकांना रोजच्यारोज पाणी पुरवठा व्हावा म्हणून हेटवणे धरण ते शहापाडा धरण वाढीव उद्भव पाणीपुरवठा योजना सुमारे २९ कोटी ३८ लाख रुपये खर्च करून राबवली गेली होती' आज अधिकृतरीत्या सांगितले जाते की या योजनेचे काम १००% पूर्ण झाले आहे, पण प्रत्यक्षात काय झाले? तर तिन दिवस आडचा

### पाण्याचा वापर अचानक वाढला? की गळती वाढली ? अथवा नियोजन चुकले ?

पाणी पुरवठा सुधारण्या ऐवजी सात दिवस आड करण्यात आला आहे. ही परिस्थिती योजनेच्या अपयशाची आहे. आणि पाण्याच्या विषयावर गेली ३५-४० वर्ष केल्या जाणाऱ्या राजकारणाची साक्ष आहे. हेटवणे धरण ते शहापाडा वाढीव उद्भव पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून दरदिवशी ६ एम एल डी पाणी शहापाड्याला पोहचते तरी शहापाडा धरणात पाणीसाठा कमी का झाला? - महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागाला पेण खारेपाट विकास संकल्प संघटनेचा सवाल आहे.

शहापाडा ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद रायगड उपविभाग पेण यांनी दिनाक १२/०१/२०२६ रोजी सर्व संबंधित ग्रामपंचायतींना निर्गमित केलेल्या अधिकृत पत्रात "शहापाडा प्रादेशिक धरणातील पाणीसाठा अल्प असल्याने सात दिवस आड पाणी पुरवठा" असा स्पष्ट दावा करण्यात आलेला आहे. या पत्राद्वारे वडखळ, वाशी, शिर्की, खारेपाट व परिसरातील अनेक गावांवर गुंतागुंतीचे, रात्री-अपरात्री पाणी वाटपाचे वेळापत्रक लादण्यात आले असून, वीज खंडित झाल्यास वेळ पुढे ढकलला जाईल आणि ग्रामस्थांनी सहकार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. मात्र पाणी हा जीवनावश्यक हक्क असताना, उपलब्ध पाण्याची वस्तुनिष्ठ आकडेवारी पाहता असा सात दिवस आड पाणी पुरवठा लादण्याचा निर्णय प्रथमदर्शनी अन्याय कारक, विसंगत आणि संशयास्पद वाटतो. कागदावर दाखवलेली टंचाई आणि प्रत्यक्ष उपलब्ध पाण्याचे आकडे यामध्ये मोठी दरी दिसून येत असून, ही परिस्थिती नैसर्गिक नसून मानव निर्मित आहे काय, असा गंभीर प्रश्न उपस्थित होतो.

साधारणतः मार्च अखेर पर्यंत पुरणारा शहापाडा धरणाचा पाणीसाठा आज जानेवारी महिन्यातच संपल्याचा दावा केला जात आहे. पाण्याचा वापर अचानक वाढला का, गळती वाढली का, नियोजन चुकले का, की पाणी अन्यत्र वळवले गेले आहे, याचा सखोल आणि पारदर्शक खुलासा होणे आवश्यक आहे.

**परिसराला दररोज व सुरळीत पाणीपुरवठा तात्काळ सुरू न केल्यास वाशी-शिर्की खारेपाट संबंधित ग्रामस्थ व नागरिक संघटना मार्फत एकत्रीत पणे, कायदेशीर मार्गाने तीव्र आंदोलन केल जाईल आसा इशारा खारेपाट विकास संकल्प संघटनेच्या माध्यमातून देण्यात आला आहे.**

**प्रकाश माळी - अध्यक्ष**
**खारेपाट विकास संघटना**

**हेटवणे धरणातून कालव्याचे काम चालु आहे. काम सुरू करण्याच्या आधी पिण्याच्या पाण्याची पर्यायी व्यवस्था केली आसती तर ही वेळ आली नसती. तसेच हेटवणे धरणातून येणारी पाईप लाईनला पुरेसा पाणी मिळत नाही. आम्ही .जिल्हा अधिकारी कार्यालयात पाणी टंचाई संदर्भात प्रस्ताव पाठविला आहे. मंजुरी मिळुन वर्क ऑर्डर निघाली की तातडीने १० दिवसात काम करून ३ दिवसाआड पाणी सुरु करण्यात येणार आहे.**

**सेफाली देशमुख,**
**ग्रामीण पाणी पुरवठा अधिकारी**


Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024